क्र.वि.नि.वि.वि./ ३१५/१३/ २०१३
मुंबई विद्यापीठ,
२७ जून २०१३,

# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक : -

विषय : - विद्यापीठातर्फे आदर्श शिक्षक/शिक्षिका पुरस्कार सन २०१२-१३ विद्यापीठ/महाविद्यालयीन शिक्षकांची शिफारस करणेबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस विदित आहे की, विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावर आदर्श शिक्षक/शिक्षिकांचा शोध घेऊन विद्यापीठातर्फे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषाच्या आधारावर **विद्यापीठ विभागातील १ शिक्षक, महाविद्यालयातील २ शिक्षक (यापैकी १ शहरी व १ ग्रामीण महाविद्यालयातील शिक्षक)** अशा आदर्श शिक्षकांना शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. तसेच विद्यापीठातर्फे निवड होणा-या पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रत्येकी **रू.** ५,०००/- रोख व त्यासोबत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.(निकषाची प्रत सोबत जोडत आहे.)

या परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येत आहे की, विद्यापीठ विभागातील/महाविद्यालयातील विविध शाखांअर्तगत कार्यरत असलेले संचालक, विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता व इतर शिक्षकवर्ग यापैकी किमान १५ वर्षे सेवा झालेल्या चारित्र्यसंपन्न, विशेष प्राविण्यासह अर्हता व अनुभव असलेले व जे राज्य/आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानित केले गेलेले अशा प्रशंसनीय निवडक व पात्र शिक्षकांची एक किंवा दोन नावे सोबत जोडलेल्या विवरण पत्राच्या मराठी व इंग्रजी अशा प्रतीमध्ये भरून सहायक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, मुंबई विद्यापीठ, कक्ष क्रमांक १३२, पहिला मजला, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. यांचेकडे दिनांक **३१ जुलै, २०१३** पर्यंत प्रस्ताव **प्रत्येकी चार प्रतीत पाठवून देण्याची व्यवस्था करावी.** (संबधित शिक्षकांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/ त्यांचा दूरध्वनी क्रमांक/महाविद्यालयाचा दूरध्वनी क्र. व घरचा पूर्ण पत्ता, तसेच संबधित शिक्षकांचे विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत (**Teachers approval**) सोबत जोडणे आवसश्यक आहे.(**दिनांक ३१ जुलै २०१३** नंतरचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत तसेच अपु-या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची, नोंद असावी.)

कृपया हे परिपत्रक आपण सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच विद्यापीठातर्फे आदर्श शिक्षक/शिक्षिकेंचा सन २००६-०७, २००७-०८, व २००८-०९ २००९-१०, २०१०-११, २०११-१२ पर्यंत पुरस्कार देऊन गौरव करण्यात आलेला आहे, अशा शिक्षक/शिक्षिकेचा प्रस्ताव पाठवू नये.

आपला विश्वासू,

प्राचार्य. (डॉ.) राजपाल एस. हांडे
(संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
मुंबई विद्यापीठ

मुंबई – ४०० ०३२
२७ जून २०१३

**************************

प्रती,

प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानीत व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालयें.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

क्र.वि.नि.वि./३१५/१३/(अ)/२०१३ २७ जून, २०१३

विद्यापीठातील विभागाचे संचालक/विभाग प्रमुख सर जे.जे. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, व वित्त व लेखा अधिकारी,

क्र.वि.नि.वि/३१५/१३/(ब)/२०१३ २७ जून, २०१३

**(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही अग्रेषित :-**

१. समन्वयक, लोककला अकादमी, विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्चगेट, मुंबई,
२. समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र, रत्नागिरी,
३. समन्वयक, डॉ. आबेंडकर सामाजिक न्याय केंद्र,
४. अध्यक्षा, महिला विकास कक्ष,
५. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव,
६. स्वीय सहायक (१) मा. कुलगुरू (२) प्र. कुलगुरू (३) संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, (४) कुलसचिव,

सहाय्यक कुलसचिव
(विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग)

कमान/आदर्श शिक्षक २०१२-१३/२७२०१३

# मुंबई विद्यापीठ
## मुंबई - ४०० ०३२

आदर्श शिक्षक/शिक्षिका पुरस्कार - शिक्षकांची निवड करण्यासाठी लागू करावयाचे निकष

| रवअ. क. | निकष | गुणांक |
|---|---|---|
| १. | सेवा प्रवेश नियमानुसार १५ गुण व पी.एच.डी.किंवा नेट/सेट/ असल्यास अधिक ५ गुण | २० गुण |
| २. | संबधित शिक्षकाने किमान २ विद्यार्थ्यांना पी.एच डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे. | १५ गुण |
| ३. | आंतराष्ट्रीय/राष्ट्रीय सेमिनारमध्ये किमान २ संशोधनात्मक पेपर्स प्रसिध्द झालेले असावेत. | १५ गुण |
| ४. | स्वत:च्या विषयाशी संबधित २ दर्जेदार ग्रंथ प्रकाशित झालेले असावेत. Research publication in referred journal with impact factor 1.0 or above after the award of Doctoral research Phd/D.sc. | १५ गुण |
| ५. | शासन मान्य संस्थेतील शिक्षक म्हणून सेवा किमान १५ वर्षे असावी | १५ गुण |
| ६. | शिक्षकाने गेल्या ५ वर्षात शिकविलेल्या प्रत्येक विषयातील किमान ५० टक्के विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. त्यातील १० टक्के विद्यार्थ्यांनी ७५ टक्के गुण प्राप्त केलेले असावेत. | १० गुण |
| ७. | मागील ५ वर्षांतील गोपनीय अहवाल किंवा परफॉर्मन्स, मुल्यमापन किमान ३ वर्षासाठी अतिउत्कृष्ट व किमान २ वर्षांसाठी उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. | १० गुण |

*******************************************

**University of Mumbai**
**Fort, Mumbai – 400 032**

## BEST TEACHER AWARD FOR THE UNIVERSITY AND COLLEGE TEACHERS

| *Sr NO.* | *Name of Teachers and Designation* | *Name of Department /College* | *Total Period of Service* | *Subject taught* | *Educational Qualification* | *Published Book/Articles & Research* | *Administrative Experience* | *Co-curricular Activities* | *Participation in Social Activities* | *Received Prize/ Award* | *Remarks* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

***Place : -*** ***Signature of Director/Head of the University Department/Principal of College Teacher Signature***

***Date : -*** ***With Seal/Rubber Stamp.***

# मुंबई विद्यापीठ

## फोर्ट, मुंबई, ४०० ०३२

### विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील प्रशंसनीय शिक्षकांना पुरस्कार

| अनु. क्र. | शिक्षकांचे नाव व पदनाम | सध्या नोकरीत असलेले ठिकाण | नोकरीचा कालावधी | विषय | शैक्षणिक पात्रता | ग्रंथ/लेखन इ. संशोधन कार्य | व्यवस्थापनातील अनुभव | सहशैक्षणिक उपक्रमातील सहभाग | सामाजिक उपक्रमातील सहभाग | मिळालेली पारितोषिके, बक्षिसे/पुरस्कार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

दिनांक :-

ठिकाण :-

विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक/विभाग प्रमुख/महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी व मोहोर

शिक्षकांची स्वाक्षरी